# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 04/05/2020 (सोमवार)
(सकाळ)

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 5 कि.मी अंतरावर सेंट्रल स्टोर पावरमेक प्रोजेक्ट कंपनी नांदा कोराडी येथे दिनांक 21/03/2020 ते दिनांक 02/05/2020 चे 00:01 वा. ते 11.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने पावरटेक कंपनीचे सेंट्रल स्टोरचे खुले परिसरातील 1) पुराना पोर्टेबल वेल्डींग मशिन 4 नग किंमती 28,000/- रू., 2) ग्रोज मेक हतोडा 21 नग कि. 14,700/-रू., 3) एल्युमिनीयम प्लैटफार्म 28 पाईप सोबत एक सेट 25,000/- रू. 4) लोहा किटंग टार्च 30 नग किंमती 20,000/-रू., 5) रेग्युलेटर (ऑक्सीजन और डी ए) 50 नग कि. 35,000/- रू. व 6) कॉपर केबल 500 मिटर किंमती 10,000/- रू. असा एकुण कि. 1,32,500/- रू. चे मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बंडु कोकाटे 9822943605 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :- अंतर्गत 03 किमी अंतरावर मौजा उमरी शिवार येथे दिनांक 03/05/2020 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे - पो.हवा. अशोकसिंग ठाकुर हे स्टाफसह पो. स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान मौजा उमरी शिवार येथे एमच-29/एके-1357 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक व मालक यांना थांबवून तपासले असता वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/- रू. रेती भरून मिळुन आली. वाहनासह एकुण 3,03,000/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर वाहनाचा चालक हा ट्रॅक्टर सोडुन फरार झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पो.हवा. अशोकसिंग ठाकुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे 7249471860 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापा :– दिनांक 02/05/2020 चे 10.30 वा. दरम्यान 30 वर्षीय फिर्यादी/पीडित यांच्या राहत्या घरी आरोपी नामे– भारत चरणदास मेश्राम, वय 30 वर्ष, रा. सिंदेवानी याने अनाधिकृतपणे प्रवेश करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री दिपक मानवटकर 9657580153 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर